सत्र खटला २३/२०२३

शा वि सचिन
नि. ४५

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची जबानी.**

मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो/करते की—

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नाव | — | हणुमंत दादाराव अंधारे |
| वय | — | ५० |
| व्यवसाय | — | शेती |
| राहणार | — | वाकडी ता परंडा जि उस्मानाबाद |

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी अभियोक्ता के.डी.कोळपे .**

**१.** मी मुक्ताजी लटके यांना ओळखतो. मी सन २०१४ मध्ये एमएसीबीच्या कायग्रलयात घरचे लाइटबिल भरण्याकरीता गेलो होतो तेव्हा इंजिनीयरने एका कागदावर माझे सहया घेतलया. मला त्याने कुठेही बोलावले नव्हते. घटनास्थळ पंचनामा मला दाखविला. त्यावर माझी सही आहे मला त्यातील मजकूर माहित नाही.

**साक्षीदार पंचनाम्यास समर्थन करत नसल्याने विद्वान सहा. सरकारी वकिलांची विनतीवरुन उलटतपासणी मागितली,—परवानगी मंजूर**

**उलटतपास सरकारी वकिलातर्फे सुरु**

**२.** हे म्हणणे खरे नाही की दि ०७.०२.२०१४ रोजी सोपान नामदेव मिसाळ सहायक अभियंता यांनी मला व मुक्ताजी लटके यांना डोमगाव धरणावर बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, तिथे ओमसाई इलेक्ट्रीकलचे मालक सचिन कुरकुटे यांनी महावितरण कंपनीची परवानगी न घेता दोन रोहित्राची उभारणी करुन विजपुरवठा चालू केल्याचे दिसले. हे म्हणणे खरे नाही की चौधरी इलेक्ट्रीकलचे मालक मोहम्मद इलियास चौधरी यांनीपण अनधिकृत रोहित्र उभा केला होता. हे म्हणणे खरे नाही की ते

घटनास्थळ सोपान मिसाळ व त्यांचे इतर कर्मचा—यांनी दाखविले. हे म्हणणे खरे नाही की तिथे तिन रोहित्र प्रत्येकी दोन पोलवर बसविले होते. हे म्हणणे खरे नाही की ते रोहित्र १०० केव्हीएचे क्षमतेचे होते. हे म्हणणे खरे नाही की ते रोहित्र स्वामी समर्थ इलेक्ट्रीकल्स सोलापूर या कंपनीचे होते. हे म्हणणे खरे नाही की तसेच त्यापैकी एक साई इलेक्ट्रीकल्स कंपनीचे ६३ केव्हीचे एक रोहित्र होते. हे म्हणणे खरे नाही की सहायक अभियंता यांनी दिसत्या परिस्थीतीचा माझेसमक्ष पंचनामा केला. हे म्हणणे खरे आहे की मी आरोपी सचिन कुरकूटे यांना ओळखतो.
हे म्हणणे खरे नाही की मी त्याला वाचविण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र.०१ तर्फे एस.एस.सुर्यवशी**

**नाकारला**

**उलटतपास आरोपी क्रमांक २ तर्फे झेड.आय.चौधरी**

**नाकारला.**

**फेरतपास नाही**

**.दिनांक — ११/०८/२०२३** **निवेदन श्रवणोत्तर स्विकृत,**

**(डी.वाय.काळे)**
**अति.सत्र न्यायाधीश, परांडा**